भंडारा जिल्हा पोलीस वार्तापत्र

(सकाळ)

जा.क्र. ६३२/माहिती कक्ष/वार्तापत्र
पोलीस अधीक्षक कार्यालय, भंडारा
दिनांक १०/०९/२०१७

**१) महिलेचा विनयभंग केल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०९/२०१७ चे २०.०० ते २१.०० वा. दर. यातील फिर्यादी व तिचा पती हे हजर असता फिर्यादी ही पडीवितील पलंगावर झोपली असता, यातील आरोपी हा फिर्यादी जवळ येवुन फिर्यादीचे विनयभंग केल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम ३५४(अ)(२), ४४८,३२३ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. परशुरामकर पो.स्टे साकोली हे करीत आहेत. आरोपी अटक आहे.

**२) मोटार सायकलची चोरी . :–**

दिनांक ०८/०९/२०१७ चे ११.०० ते १५.०० वा दर. यातील फिर्यादी ओमप्रकाश बंडु हुकरे वय २९ वर्ष रा. लोनारा हा आपले होन्डा स्प्लेंडर प्लस मोटार सायकल ने स्वगावी वरून पॉवर अॅन्ड शुगर कंपनी कार्यालयात जाण्यासाठी येवुन तृप्ती बारचे समोरील टिनाचे शेड मध्ये मोटार सायकल क्र. एमएच ३६ वाय १८२४ कि. ४०,०००/रु. ची लॉक करून त्याचे कार्यालयात जावुन नतंर स्वगावी जाण्यासाठी मोटार सायकल जवळ आला असता मोटार सायकल दिसुन न आल्याने कोणीतरी अज्ञात चोराने कोणीही नसल्याची संधी साधुन चोरून नेल्याने फिर्यादीचे तोंडी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन पवनी येथे कलम ३७९ भांदवि. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. मस्के पो.स्टे पवनी हे करीत आहेत.

**३) मॅग्नीजची चोरी करण्याचा प्रयत्न करतांना मिळुन आल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०८/०९/२०१७ चे २०९.३० वा दर. यातील फिर्यादी बुधराम केदारू देंवागनम वय ५७ वर्ष रा. डोंगरी बु. माईन्स हा आपले सहकार्यासह नॉर्थ डोंगरी माईन्स परिसरात पेट्रोलींग करीत असता, एक मारोती सुझुकी ओमनी गाडी क्र.एमएच ३१ झेड ०८५१ ही उभी दिसली व आरोपी पडतांनी दिसला गाडी जवळ जावुन पाहनी केली आता गाडी मध्ये काळा दगड मॅग्नीज ५०० किलो कि. ५,०००/रु चा माल चोरी करतांनी मिळुन आल्याने फिर्यादीचे लेखी रिपोट वरून पोलीस स्टेशन गोबरवाही येथे कलम ३७९,५११ भांदवि. सहकलम ४८(७)(८) म.ज.म.अधी. १९६६ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. लिल्हारे पो.स्टे गोबरवाही हे करीत आहेत.

**४) चार चाकी वाहनाच्या धडकेत एक जखमी. :–**

दिनांक ०८/०९/२०१७ चे २२.३० वा. दर. यातील जखमी हा एनएच ०६ रोडवर त्याचे डावे साईडला रोडचे कडेला उभा असता यातील आरोपी वाहन चालकाने त्याचे ताब्यातील स्कोडा वाहन भरधाव वेगाने निष्काळजीपणे चालवुन फिर्यादीला मागेहुन धडक मारून त्यास जखमी करण्यास कारणीभुत झाल्याने जखमीचे बयान व डॉ. रिपोर्ट वरून सरतर्फे फिर्यादी अरवींद जगने यांचे रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम २७९,३३७ भादवी. सहकलम १८४,१३४ मोवका. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास पोहवा. चोपकर पो.स्टे. भंडारा हे करीत आहेत.

**५) संगनमत करुन भांडण व शिवीगाळ करुन मारहान केली व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने गुन्हा नोंद . :–**

दिनांक ०९/०९/२०१७ चे ०८.०० वा. दर. यातील फिर्यादी ही तिच्या घरी अंगणात धुणा धुत असतांनी यातील आरोपीतांनी संगनमत करुन फिर्यादीचे अंगणात जावुन आरोपी क्र. २ ने फिर्यादीस तु मला न विचारता माझे मुलाला १२,०००/–रु. उसने का दिले म्हणुन आरोपी क्र. १ ने फिर्यादी सोबत शिवीगाळ भांडण करुन फिर्यादीचे उजवे हाताचे मनगटावर चावा घेवुन तिला खाली पाडुन आरोपी क्र. २ ने तिचे छातीवर बसुन डोक्यावर मारुन जखमी केले व जिवाने मारण्याची धमकी दिल्याने फिर्यादींचे लेखी व डॉक्टरी रिपोर्ट वरून पोलीस स्टेशन लाखनी येथे कलम ४४७,३२४,५०४,५०६,३४ भादवी. अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला. पुढील तपास सफौ. ऊईके पो.स्टे. लाखनी हे करीत आहेत.

६) महिलेचा मृत्यु . :–

दिनांक ०९/०९/२०१७ चे ०५.१५ वा. दर यातील फिर्यादीची मृतक मोठी बहीण सौ. शारदा अनिल पोपताने वय ४० वर्ष, रा. सिव्हील वार्ड साकोली हिचे ९ वर्षापुर्वी अनिलकुमार पोपताने वय ४० वर्ष, यांचे सोबत लग्न लावुन दिले होते. मागील ३ ते ४ वर्षापासुन तिचे पती व सासु हे हुंडयासाठी त्रास देत असल्याची माहिती फिर्यादीस मृतकने फोनवर सांगितले होते, दिनांक ०९/०९/२०१७ ला ०४.१६ वा. दरम्यान फिर्यादीचे वडीलाचे मोबाईलवर अनिलकुमार पोपताने यांनी फोन करुन सांगितले की शारदा हिची प्रकृती खराब झाली आहे. तिला येथुन घेवुन जा अशी माहिती दिल्याने फिर्यादी हा अनिलकुमार पोपताने याचे घरी पोहचले असता शारदा ही मरण पावलेली होती, तिचे मरणाचे संशय असल्याने फिर्यादी लखन गंगाराम ईसरामे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोना. मडावी पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

७) औषधोपचारा दरम्यान महिलेचा मृत्यु . :–

दिनांक ०३/०९/२०१७ चे ११.०० वा. दर. यातील मृतक वैशाली अनिल परशुरामकर वय ३८ वर्ष, रा. खोंडशिवनी जिल्हा गोंदिया ही एन एच ०६ रोड टोल नाका साकोली येथे रोड अपघात झाल्याने तिला उपचारा करीता न्युरॉन हॉस्पीटल धंतोली नागपुर येथे भरती केले असता उपचारा दरम्यान मरण पावल्याने पोस्टे धंतोली येथे मर्ग क्र. ००/१७ कलम १७४ जाफौ. चे प्राप्त कागदपत्र टापालाव्दारे दिनांक ०९/०९/२०१७ प्राप्त झाल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. मडावी यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन साकोली येथे कलम १७४ जाफौ. अन्वये नंबरी मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. नवखरे पोलीस स्टेशन साकोली हे करीत आहेत.

८) विष प्राशन केल्याने युवकाचा मृत्यु . :–

दिनांक ०९/०९/२०१७ चे ०४.४५ वा. दर. यातील मृतक संदीप राजकुमार बोरकर वय २० वर्ष, रा. भगतसिंग वार्ड टाकळी याने विष प्राशन केल्याने त्यास औषधोपचारा करीता सा. रु. भंडारा येथे नेले असता डॉक्टरने तपासुन मृत घोषीत केल्याने सरतर्फे फिर्यादी पोना. वलथरे यांचे रिपोर्ट वरुन पोलीस स्टेशन भंडारा येथे कलम १७४ जाफौ. अन्वये मर्ग नोंद करण्यात आला. पुढील तपास पोहवा. फुंडे पोलीस स्टेशन भंडारा हे करीत आहेत.

९) अवैध दारू/जुगार अडयावर धाडी . :–

दिनांक ०९/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी पोस्टे कारधा, भंडारा, वरठी, तुमसर, आंधळगाव व लाखांदुर येथे अवैध दारू/जुगार अडयावर धाडी घालुन एकुण ०७ गुन्हे दाखल करून ४० लिटर हा.भ. दारू किंमती ३१८०/–रु. १ लिटर ८०० मिली लिटर देशी दारु किंमती ५२०/–रु. तसेच जुगारातुन किंमती १८४०/–रु. असा एकुण किंमती ५,५४०/–रु. माल जप्त करण्यात आला आहे.

१०) मोटार वाहन कायदयाखाली कारवाई. :–

दिनांक ०९/०९/२०१७ रोजी भंडारा जिल्हा पोलीसांनी मोटार वाहन कायदयाखाली एकुण ९६ प्रकरणांची नोंद करण्यात आलेली असून अवैध प्रवासी ०४ तीन सिटर वाहनांवरती ०५ केसेस व तसेच ईतर वाहनांवरती ८७ केसेस करण्यात आलेल्या आहेत.

पोलीस उपअधिक्षक (गृह)
भंडारा करीता
दुरध्वनी.क्र. ९९२७४१६८१

प्रति,

जिल्हा माहिती अधिकारी, भंडारा

वर्तमान पत्राचे संपादक व जिल्हा प्रतिनिधी यांना उपरोक्त माहीती दैनिक वर्तमान पत्रात प्रसिध्द करण्याकरीता कळविण्यास विनंती आहे.

प्रत, संगणक कक्ष, भंडारा यांना भंडारा पोलीस संकेतस्थळावर ठेवण्याकरीता.